# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/४७ /२०२२ दिनांक :- ०८/०३/२०२२

परिपत्रक

विषय : सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील भांडवली व महसुली कामांच्या देयकांच्या अदायगीबाबत.

सन २०२१-२०२२ आर्थिक वर्ष दि.३१/०३/२०२२ अखेर संपूष्टात येत आहे. असे निदर्शनास आले आहे की, अद्याप काही विभागांनी त्यांचेकडील चालू आर्थिक वर्षातील भांडवली / महसुली कामांची देयके अदायगी कामी लेखा विभागाकडे सादर केलेली नाहीत. प्रति वर्षी मार्च महिन्यामध्ये शेवटच्या २ ते ३ दिवसात मोठ्या प्रमाणावर देयके लेखा विभागाकडे अदायगीकामी सादर केली जातात. सर्व प्राप्त देयके ही दि.३१/०३/२०२२ पर्यंतच अदा करावयाची असल्याने लेखा विभागास देयके तपासणीकामी पूरेसा कालावधी उपलब्ध होत नाही.

सबब, सर्व विभागांना सुचीत करण्यात येते की, चालू आर्थिक वर्षातील आपले विभागाकडील सर्व प्रकारची महसुली देयके ( उदा.पगाराची देयके, मानधन देयके, प्रवास भत्ता, रजा प्रवास भत्ता, वाहन इंधन इत्यादी.) दि.१६/०३/२०२२ पर्यंत लेखा विभागाकडे सादर करावीत व भांडवली कामांची ( महसुली - किरकोळ दुरूस्तीसह) देयके दि.२८/०३/२०२२ पर्यंत लेखा विभागाकडे सादर करावीत जेणेकरून लेखा विभागास दि.३१/०३/२०२२ पर्यंत देयकांची योग्य तपासणी करून अदायगी करणे शक्य होईल. विलंबाने सादर केलेली देयके लेखा विभागात स्विकारली जाणार नाहीत त्यामुळे चालू आर्थिक वर्षात अदायगी न झाल्यास संपूर्ण जबाबदारी ही संबंधीत विभागाची राहील याची नोंद घ्यावी.

८/३/२२

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति:- सर्व संबंधीत विभाग